# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**'आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था'**

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

**e_mail: edn_mcaer@rediffmail.com** **दूरध्वनी / फॅक्स क्र. २५५३७६८८**

**वेबसाईटः www.mcaer.org**


---

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/३१०/१०/८७१ दि.२३ मार्च,२०१०

## <u>प रि प त्र क</u>

**विषयः- राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत पदवीपूर्व अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या आंतरविद्यापीठीय / आंतरमहाविद्यालयीन बदल्यांबाबत निकष व कार्यपध्दती.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कृषी व संलग्न विद्याशाखांची पदवी अभ्यासक्रमाची ११८ महाविद्यालये अस्तित्वात आहेत. या महाविद्यालयांमध्ये केंद्रीय पध्दतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असल्यामुळे ब-याचवेळा विद्यार्थ्यांना त्यांच्या मूळ पसंतीक्रमाऐवजी राज्यातील अन्य महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळत असतात. वैयक्तिक अडचणी, हवामान न मानवणे, प्रकृती अस्वास्थ्य इत्यादी अनेक कारणांमुळे एका कृषी विद्यापीठांतर्गत असलेल्या महाविद्यालयातून दुस-या कृषी विद्यापीठांतर्गत असणा-या महाविद्यालयामध्ये (आंतरविद्यापीठीय) किंवा एकाच कृषी विद्यापीठांतर्गत इतर महाविद्यालयामध्ये (आंतरमहाविद्यालयीन) बदली होण्याबाबत विद्यार्थ्यांकडून अर्ज करण्यात येतात. ही बाब विचारात घेता, अशा बदल्यांसाठी कार्यपध्दती विहित करणे, त्यासाठी निकष निश्चित करणे इत्यादी बाबी कृषी परिषद कार्यालयाच्या विचाराधीन होत्या.

यासंदर्भात कृषी परिषदस्तरावर राज्यातील चारही कृषी विद्यापीठातील संबंधित अधिका-यांची बैठक आयोजित करून याप्रकरणी निकष व कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. गरजू विद्यार्थ्यांना याबाबत नीट आकलन व्हावे, बदलीची पात्रता विचारात घेऊन आवश्यक त्या पूर्ततेसह विहित वेळेत योग्य ठिकाणी विद्यार्थ्यांनी विहित प्रपत्रात अर्ज सादर करावेत, यासाठी निश्चित केलेले निकष **परिशिष्ट 'अ'** मध्ये देण्यात आले असून कार्यपध्दती **परिशिष्ट 'ब'** मध्ये विशद करण्यात आली आहे. निकष पूर्ण करीत असलेल्या इच्छुक विद्यार्थ्यांनी विहित कार्यपध्दतीने विनंती अर्ज सादर करण्यासाठी विनंती अर्जाचा विहित नमुना **परिशिष्ट 'क'** येथे देण्यात आला आहे.

सदर परिपत्रक कृषी परिषदेच्या **'www.mcaer.org'** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले असल्यामुळे इच्छुक विद्यार्थ्यांना विनंती अर्जाची प्रत याच संकेतस्थळाद्वारे प्राप्त करून घेता येईल.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवीपूर्व अभ्यासक्रमाच्या शासकीय, अनुदानित आणि विना अनुदानित महाविद्यालयांच्या सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, सर्व इच्छुक विद्यार्थ्यांना आंतरविद्यापीठीय / आंतरमहाविद्यालयीन बदलीचे निकष व कार्यपध्दती अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून या

परिपत्रकास **दरवर्षी दि. १ एप्रिल ते १५ एप्रिल या कालावधीमध्ये आपापल्या महाविद्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्दी द्यावी.**

प्रस्तुत परिपत्रकातील निर्देशांची सर्व संबंधितांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

सहपत्रे : चार.

स्वाक्षरीत/-
**(गणेश ठाकूर)**
**महासंचालक**

प्रति,

(१) राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवीपूर्व अभ्यासक्रमाची सर्व शासकीय / अनुदानित / विना अनुदानित महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य.

२/- सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत परिपत्रकाची प्रत त्यांनी महाविद्यालयाच्या सूचना फलकावर उपरोक्त कालावधीमध्ये प्रसिध्द करून **दरवर्षी पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.**

प्रत:-

(२) अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली

(३) कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, प्राप्त विनंती अर्जांपैकी आपल्या विद्यापीठांतर्गत आंतरमहाविद्यालयीन बदली अर्जांची छाननी करून **पंधरा दिवसांच्या कालावधीत** अशा आंतरमहाविद्यालयीन बदली अर्जांबाबत विद्यापीठस्तरावर योग्य ते निर्णय घेऊन आपल्या विद्यापीठाच्या अधिष्ठाता (कृषी) यांच्या मान्यतेने ते निकाली काढावेत. तद्नंतर आंतरविद्यापीठीय विनंती अर्जांची छाननी करून **परिशिष्ट 'ड' प्रमाणे गोषवारा दहा दिवसांच्या कालावधीत कृषी परिषद कार्यालयास यथावश्यक रकमेच्या धनाकर्षासह सादर करावा.**

प्रतिलिपी :

(१) मा. मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मा. मंत्री (कृषी) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी...

(२) मा. उपाध्यक्ष यांचे स्वीय सहायक, कृषी परिषद, पुणे यांना माहितीसाठी...

(३) श्रीमती रुपाली विश्वकर्मा, मे. विनटेक सोल्युशन्स, ऑफीस क्र. १०, मयूर नगरी, काटेपूरम चौकाजवळ, नवी सांगवी, पुणे-१७.

२/- यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी उक्त परिपत्रक सहपत्रांसह कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर त्वरीत उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी.